दिनांक 21/09/2025

**प्रेसनोट**

**अवैध व्यवसाय विरोधी अभियान- 05**

## नांदेड परिक्षेत्रात अवैध दारु निर्मूलनासाठी मासरेड चे आयोजन

नांदेड परिक्षेत्रात हातभट्टीची दारु व रसायनाचा नाश, त्याचप्रमाणे अवैध दारुची वाहतूक व विक्री रोखण्यासाठी, दिनांक. 20/09/2025 रोजी परिक्षेत्रातील चारही जिल्हयांत एकाच वेळी मासरेड चे आयोजन करण्यात आले होते.

परिक्षेत्रातील नांदेड, परभणी, हिंगोली व लातूर या चारही जिल्हयांत मासरेड दरम्यान, संबंधित घटकांनी केलेली कार्यवाही खालील प्रमाणे:

| अ.क्र | जिल्हा | एकुण दारुबंदी केसेस | सहभागी आरोपींची संख्या | जप्त मुद्देमालाचे वर्णन | | जप्त मुद्देमालाची किंमत | सहभागी अधिकारी व अंमलदारांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | नांदेड | 95 | 96 | 1.हातभट्टी दारु | 1146 लीटर | 3,92,755/- | अधिकारी: 83<br>अंमलदार: 290 |
| | | | | 2.दारुचे रसायन | 3360 लीटर | | |
| | | | | 3.देशी दारु | 1100 बॉटल | | |
| | | | | 4.विदेशी दारु | 34 बॉटल | | |
| | | | | 5.सिंदी | 800 लीटर | | |
| 2 | परभणी | 44 | 46 | 1.हातभट्टी दारु | 156 लीटर | 67,965/- | अधिकारी: 40<br>अंमलदार: 117 |
| | | | | 2.दारुचे रसायन | 310 लीटर | | |
| | | | | 3.देशी दारु | 530 बॉटल | | |
| 3 | हिंगोली | 31 | 31 | 1.हातभट्टी दारु | 54 लीटर | 46,970/- | अधिकारी: 20<br>अंमलदार: 135 |
| | | | | 2.देशी दारु | 507 बॉटल | | |
| 4 | लातूर | 57 | 57 | 1.हातभट्टी दारु | 3675 लीटर | 4,98,545/- | अधिकारी: 33<br>अंमलदार: 166 |
| | | | | 2.दारुचे रसायन | 4253 लीटर | | |
| | | | | 3.देशी दारु | 648 बॉटल | | |
| | | | | 4.विदेशी दारु | 04 बॉटल | | |
| एकूण | | 227 | 230 | 1.हातभट्टी दारु | 5031 लीटर | 10,06,235/- | अधिकारी: 176<br>अंमलदार: 706 |
| | | | | 2.दारुचे रसायन | 7923 लीटर | | |
| | | | | 3.देशी दारु | 2785 बॉटल | | |
| | | | | 4.विदेशी दारु | 38 बॉटल | | |
| | | | | 5.सिंदी | 800 लीटर | | |

सदर कारवाईत, परिक्षेत्रातील पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली संबंधित जिल्हयातील अपर पोलीस अधीक्षक, सर्व पोलीस उप अधीक्षक, संबंधित पोलीस ठाण्यांचे पोलीस निरीक्षक/सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, अंमलदार यांचे सह स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांचा समावेश होता. या मोहिमेत परिक्षेत्रातील (176) अधिकारी व (706) अंमलदार सहभागी झाले होते. चारही जिल्हयांनी केलेल्या मासरेड दरम्यान एकूण (227) केसेस नोंदविण्यात आल्या असून 10,06,235 /- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

**हेल्पलाईन 'खबर'** : परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांच्या निर्मूलनासाठी पोलीस उपमहानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी 'खबर' या नावाने हेल्पलाईन सुरु केली असून, नागरिक आता सदर हेल्पलाईन क्रमांक **91 50 100 100** यावर फोन करुन आपल्या भागातील अवैध व्यवसाय व गैरप्रकारांची माहिती देवू शकतील.

आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती नागरिकांनी, संबंधित पोलीसांना देऊन, पोलीसांच्या सदर मोहिमेस हातभार लावावा, असे आवाहन पोलीस उप महानिरीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.

कार्यालय पोलीस उप महानिरीक्षक,<br>नांदेड परिक्षेत्र, नांदेड